# गोदावरी आरती

www.GodavariAarti.org

गोदावरी आरती ऐकण्यासाठी QR कोड मोबाईलवर स्कॅन करा.
#godavariaarti

**श्री आरती गोदावरी ।**
**उगमस्थ ब्रह्मगिरी ।**
**कुशावर्त गंगाद्वारी ।**
**माता श्री त्र्यंबकेश्वरी**
**।।१।। धृ०**

पुण्यसलीला 'गोदामाई', 'श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर' येथे, 'ब्रह्मगिरी' पर्वतावर उगम पावते. आपल्या उगमस्थानापासून भूगर्भमार्गाने 'गंगाद्वार' आणि पुढे 'कुशावर्त' कुंडात प्रकट होते.

१

**जय पतित पावनी ।**
**निवृत्ति नाथाचरणी ।**
**गौतम श्री जटाधारी ।**
**वरदात्री गोदावरी**
**।।२।।**

एका आख्यायिकेनुसार, गोहत्यापतित 'श्री गौतम ऋषीं'च्या पापनिवारणार्थ 'श्री शंकर भगवान' ज्या ठिकाणी आपल्या जटा आपटतात ते गोदावरीचे उगमस्थान. पुढे 'गौतम ऋषी' कुशांचा बांध घालून गोदावरीचे पाणी कुंडात आडवतात ते 'कुशावर्त' होय, जिथे गोदावरी जणू 'संत श्री निवृत्तीनाथ' यांना चरणस्पर्श करते आहे. पतितांना पावन करणारी, वरदात्री गोदावरी अशा श्रद्धेने भाविक गोदावरी पात्रांत स्नान करतात.

२


**जय अमृत वाहिनी ।**
**वरदा माता अंजनी ।**
**वंदन श्री रामभूमी ।**
**कुंभपात्री गोदावरी**
**।।३।।**

'अंजनीमाते'चा निवास व 'श्री हनुमान' यांचे जन्मस्थान 'अंजनेरी' पर्वत, जणू गोदावरीला आशिष देत असून, वनवास काळात श्रीराम यांचा निवास 'पंचवटी' भूमीला, गोदावरी जणू वंदन करते आहे. 'सागरमंथना'तून प्राप्त 'अमृतकुंभ' रत्नांतील अमृत थेंब, 'रामकुंड-श्रीक्षेत्र नाशिक' व 'कुशावर्त-श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर' येथे पडले, म्हणून अमृतवाहिनी गोदावरी पात्रांतील या तीर्थक्षेत्रांत दर १२ वर्षांनी "सिंहस्थ कुंभमेळा" भरतो.

३

**कृती घडी**

कृती वाचून झाल्यावर ह्या संपूर्ण घडीवर डिंक लावा




**जय जीवन दायिनी ।**
**गोवर्धन जनस्थानी ।**
**नाथसागरा पैठणी ।**
**जलदात्री गोदावरी**
**।।४।।**

'श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर' येथून प्रवाहित जीवन दायिनी, जलदात्री गोदावरी मनोहर नागमोडी वळणं घेत-घेत, 'श्रीक्षेत्र नाशिक' ('जनस्थान') येथे 'गंगापुर' ('गोवर्धन') धरण आणि पुढे 'श्रीक्षेत्र पैठण' ('प्रतिष्ठान') येथे 'जायकवाडी' ('नाथसागर') धरणामध्ये स्थिरावल्यामुळे सभोवतालचा परिसर सुजलाम्-सुफलाम् झाला आहे.

४

**जय गंगाश्री दक्षिणी ।**
**अनुबन्ध पंचक्षेत्री ।**
**संगम श्री राजमुंद्री ।**
**सुखदात्री गोदावरी**
**।।५।।**

'दक्षिणगंगा' अशी ख्याति असलेल्या सुखदात्री माता गोदावरीचा प्रवास सह्याद्रीच्या कुशीत पश्चिम घाटांत १,०६७ मीटर उंचीवर सुरू होऊन, पुढे ती 'दख्खन'च्या पठारावरून साधारणतः 'आग्नेय' दिशेने, 'महाराष्ट्र', 'छत्तीसगढ', 'ओडिशा', 'तेलंगणा' आणि 'आंध्रप्रदेश' या पांच राज्यांतून होत-होत, शेवटी आंध्रप्रदेशांतील 'राजमहेंद्री' (राजमुंद्री) येथे बंगालच्या उपसागरास संगम पावते.

५

**तुल्या वसिष्ठा गौतमी ।**
**श्रीभारद्वाजी आत्रेयी ।**
**कौशिकी वृद्धगौतमी ।**
**धारासप्त गोदावरी**
**।।६।।**

*"सप्तगोदावरी स्नात्वा नियतो नियताशनः। महापुण्यमप्राप्नोति देवलोके च गच्छति॥"* या श्लोकानुसार पुराणांत वर्णन केलेल्या, माता गोदावरी च्या महापुण्यप्राप्तिकारक सप्त धारा - 'तुल्या', 'वसिष्ठा', 'गौतमी', 'कौशिकी', 'आत्रेयी', 'भारद्वाजी' आणि 'वृद्धगौतमी' या नांवाने प्रसिद्ध आहेत. १,४६५ किमी लांब गोदावरी पात्रांत एकूण साडेतीन कोटी तीर्थं असल्याचे मानले जाते, त्यामुळे भाविक श्रद्धेने 'गोदावरी-परिक्रमा' करतात.

६


# गोदावरी आरती

www.GodavariAarti.org

गोदावरी आरती ऐकण्यासाठी QR कोड मोबाईलवर स्कॅन करा.
#godavariaarti

**श्री आरती गोदावरी ।**
**उगमस्थ ब्रह्मगिरी ।**
**कुशावर्त गंगाद्वारी ।**
**माता श्री त्र्यंबकेश्वरी**
**।।१।। धृ०**

पुण्यसलीला 'गोदामाई', 'श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर' येथे, 'ब्रह्मगिरी' पर्वतावर उगम पावते. आपल्या उगमस्थानापासून भूगर्भमार्गाने 'गंगाद्वार' आणि पुढे 'कुशावर्त' कुंडात प्रकट होते.

१

**जय पतित पावनी ।**
**निवृत्ति नाथाचरणी ।**
**गौतम श्री जटाधारी ।**
**वरदात्री गोदावरी**
**।।२।।**

एका आख्यायिकेनुसार, गोहत्यापतित 'श्री गौतम ऋषीं'च्या पापनिवारणार्थ 'श्री शंकर भगवान' ज्या ठिकाणी आपल्या जटा आपटतात ते गोदावरीचे उगमस्थान. पुढे 'गौतम ऋषी' कुशांचा बांध घालून गोदावरीचे पाणी कुंडात आडवतात ते 'कुशावर्त' होय, जिथे गोदावरी जणू 'संत श्री निवृत्तीनाथ' यांना चरणस्पर्श करते आहे. पतितांना पावन करणारी, वरदात्री गोदावरी अशा श्रद्धेने भाविक गोदावरी पात्रांत स्नान करतात.

२

**जय अमृत वाहिनी ।**
**वरदा माता अंजनी ।**
**वंदन श्री रामभूमी ।**
**कुंभपात्री गोदावरी**
**।।३।।**

'अंजनीमाते'चा निवास व 'श्री हनुमान' यांचे जन्मस्थान 'अंजनेरी' पर्वत, जणू गोदावरीला आशिष देत असून, वनवास काळात श्रीराम यांचा निवास 'पंचवटी' भूमीला, गोदावरी जणू वंदन करते आहे. 'सागरमंथना'तून प्राप्त 'अमृतकुंभ' रत्नांतील अमृत थेंब, 'रामकुंड-श्रीक्षेत्र नाशिक' व 'कुशावर्त-श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर' येथे पडले, म्हणून अमृतवाहिनी गोदावरी पात्रांतील या तीर्थक्षेत्रांत दर १२ वर्षांनी "सिंहस्थ कुंभमेळा" भरतो.

३

**कृती घडी**

कृती वाचून झाल्यावर ह्या संपूर्ण घडीवर डिंक लावा






**जय जीवन दायिनी ।**
**गोवर्धन जनस्थानी ।**
**नाथसागरा पैठणी ।**
**जलदात्री गोदावरी**
**।।४।।**

'श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर' येथून प्रवाहित जीवन दायिनी, जलदात्री गोदावरी मनोहर नागमोडी वळणं घेत-घेत, 'श्रीक्षेत्र नाशिक' ('जनस्थान') येथे 'गंगापुर' ('गोवर्धन') धरण आणि पुढे 'श्रीक्षेत्र पैठण' ('प्रतिष्ठान') येथे 'जायकवाडी' ('नाथसागर') धरणामध्ये स्थिरावल्यामुळे सभोवतालचा परिसर सुजलाम्-सुफलाम् झाला आहे.

४

**जय गंगाश्री दक्षिणी ।**
**अनुबन्ध पंचक्षेत्री ।**
**संगम श्री राजमुंद्री ।**
**सुखदात्री गोदावरी**
**।।५।।**

'दक्षिणगंगा' अशी ख्याति असलेल्या सुखदात्री माता गोदावरीचा प्रवास सह्याद्रीच्या कुशीत पश्चिम घाटांत १,०६७ मीटर उंचीवर सुरू होऊन, पुढे ती 'दख्खन'च्या पठारावरून साधारणतः 'आग्नेय' दिशेने, 'महाराष्ट्र', 'छत्तीसगढ', 'ओडिशा', 'तेलंगणा' आणि 'आंध्रप्रदेश' या पांच राज्यांतून होत-होत, शेवटी आंध्रप्रदेशांतील 'राजमहेंद्री' (राजमुंद्री) येथे बंगालच्या उपसागरास संगम पावते.

५

**तुल्या वसिष्ठा गौतमी ।**
**श्रीभारद्वाजी आत्रेयी ।**
**कौशिकी वृद्धगौतमी ।**
**धारासप्त गोदावरी**
**।।६।।**

*"सप्तगोदावरी स्नात्वा नियतो नियताशनः। महापुण्यमप्राप्नोति देवलोके च गच्छति॥"* या श्लोकानुसार पुराणांत वर्णन केलेल्या, माता गोदावरी च्या महापुण्यप्राप्तिकारक सप्त धारा - 'तुल्या', 'वसिष्ठा', 'गौतमी', 'कौशिकी', 'आत्रेयी', 'भारद्वाजी' आणि 'वृद्धगौतमी' या नांवाने प्रसिद्ध आहेत. १,४६५ किमी लांब गोदावरी पात्रांत एकूण साडेतीन कोटी तीर्थं असल्याचे मानले जाते, त्यामुळे भाविक श्रद्धेने 'गोदावरी-परिक्रमा' करतात.

६